**स्पे.मु.नं.०१/२०२३**
**निशाण क्र. २६० ची पुरवणी**

**पुढील उलटतास शपथेवर सुरू.**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ९—ब तर्फे वकील श्री.ए.ए.पाटील यांचे तर्फे सुरु.**

दावा मिळकतीच्या चतु:सिमा मला माहिती आहे. पुर्वे विजय घाडगे यांचे मुलाची शेतजमिन, पश्चिमेस विठ्ठल श्रीरंग घाडगे, दक्षिणेस रस्ता व उत्तरेस ओढा आहे. सदरचे साठेखत प्रभाकर कुलकर्णी, गोपाळ कुलकर्णी व चंद्रकांत कुलकर्णी यांचेकडून मी व रावसाहेब कुलकर्णी यांनी करून घेतले होते. सदरचे साठेखत केले त्यावेळी ते रक्कम रू. २,५०,०००/— च्या खरेदीपोटी केले होते व साठेखताच्या वेळी रक्कम रू. ५०,०००/— दिले होते.

हे म्हणणे खरे नाही की, झालेल्या साठेखता बाबत दाव्यात नमुद असलेला रावसाहेब कुलकर्णी यांनी त्यांचा हिस्सा माझे हक्कात सोडून दिला हे मी खोटे सांगत आहे. हक्कसोड पत्रावर साक्षीदार म्हणून मोहन बोराडे व बाळू दत्तु कानतोडे हे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.९ ने हक्कसोडच्या बदल्यात माझेकडून रक्कम रू.२५,०००/— घेतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ९ यास हृदय विकाराचा त्रास असल्याने त्याला फसवून मी सदरचे हक्कसोड पत्राचा दस्त करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत स्वत:ला मिळावी व रावसाहेब कुलकर्णी यांना त्यांचा हिस्सा मिळू नये यासाठी सदरचा हक्कसोड पत्राचा दस्ता खोटा तयार करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत गट नं.२१२ ही माझे ताब्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासणी प्रतिज्ञापत्रातील कलम १२ मधील मजकुर ''२० रूपयेचे स्टॅम्प वर प्रतिवादी क्रमांक ९ ने रक्कम रूपये २५,०००/— घेवून दावा मिळकतीतून त्याचा हक्क सोडून दिला'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझे बरोबर प्रतिवादी क्र. ९ यांचा १/२ हिस्सा आहे. तसेच त्याच्या मृत्यु पश्चात प्रतिवादी क्र.९/अ व ब यांचा देखील दावा मिळकतमध्ये १/२ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकत गट नं. २१२ च्या पूर्ण मिळकतीचे खरेदी खत करून मागण्याचा हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)
दि.२३.०१.२०२४ — दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**स्पे.मु.नं.०१/२०२३**
**निशाण क्र.२६० ची पुरवणी**

**पुढील उलटतास शपथेवर सुरू.**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ८ व १५ तर्फे वकील श्री.एस.ए.रोकडे यांचे तर्फे सुरु.**

हे म्हणणे खरे आहे की, साठेखत झाले त्यावेळी प्रभाकर कुलकर्णी, गोपाळ कुलकर्णी, विश्वंभर कुलकर्णी तसेच त्यांच्या पत्नी व त्यांची मुले हयात होती. हे म्हणणे खरे नाही की, साठेखताचा दस्त नोंदविला त्यावेळी वरील सर्वाची संमती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वरील सर्व व्यक्तींच्या सहया साठेखतावर नव्हत्या. साक्षीदार स्वतः सांगतो की, ज्या व्यक्तींची नावे ७/१२ वर होती त्यांची सदर साठेखतावर सहया होत्या. हे म्हणणे खरे आहे की, रावसाहेब कुलकर्णी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, साठेखताचा दस्त चंद्रकांत कुलकर्णी व प्रभाकर कुलकर्णी यांनी रावसाहेब कुलकर्णी व मला लिहून दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि.२०.०१.२०२४

**स्पे.मु.नं.०१/२०२३**
**निशाण क्र.२६० ची पुरवणी**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढीलसरतपास वादी तर्फे वकील श्री. डी.आर. देसाई यांचे तर्फे शपथेवर सुरू**

मी मयत प्रभाकर कुलकर्णी तसेच मयत विश्वंभर यांचा मुलगा चंद्रकांत कुलकर्णी यांना ओळखतो. दावा मिळकतीचे साठेखत मला व रावसाहेब कुलकर्णी यांना प्रभाकर व चंद्रकांत यांनी दि.२४.०७.१९९७ रोजी लिहून दिला. सदरचा दस्त हा बॉण्ड रायटर केशव वीर यांनी लिहिला. आता मला सदरचे साठेखताचा दस्त दाखविला. तो तोच असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर दस्तावर लिहून देणार म्हणून प्रभाकर व चंद्रकांत यांच्या सहया असून व घेणार म्हणून माझी व रावसाहेब यांची सही आहे.सदर दस्तावर साक्षीदार म्हणून भागवत गणपत मोरे व जनार्धन निवृत्ती घाडगे यांच्या सहया आहेत. सदर दस्तास **निशाण क्र. ३६४** देण्यात येत आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ८ व १५ तर्फे वकील श्री.एस.ए.रोकडे यांचे तर्फे सुरु.**

प्रतिवादी क्र. ८ व १५ यांच्या विनंती अर्ज **नि. ३६५** मंजूर केल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ७, ९ ते १४ व १६ यांचा व त्यांचे विधिज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर करिता उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि.०६.०१.२०२४